जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2021
पुण्यनगरी

# ग्रामविकासाच्या क्षेत्रात अनेक रोजगार संधी : डॉ. दावणे

कोल्हापूर : प्रतिनिधी

ग्रामविकासविषयक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शासनासह खासगी क्षेत्रातही अनेक रोजगार संधी उपलब्ध आहेत. त्यांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. प्रसाद दावणे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या



यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्यामार्फत 'ग्रामीण अभ्यासक्रमातील रोजगाराच्या संधी' या विषयावर आयोजित वेब्रिनारमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. प्रकाश पवार यांनी ग्रामविकास अभ्यासक्रमाची माहिती दिली. ज्या विद्यार्थ्यांना शेती, सहकार, सीएसआर, एनजीओ, बँकिंग आणि स्पर्धा परीक्षा आदींच्या माध्यमातून ग्रामविकासामध्ये योगदान द्यावयाचे आहे, त्यांनी जरूर प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी सहायक प्राध्यापक डॉ. संतोष सुतार आणि डॉ. कविता वड्राळे यांनी अभ्यासक्रमाची रूपरेषा, प्रवेश प्रक्रिया इत्यादींची सखोल माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2021
सकाळ

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात 'डी. वाय. अभियांत्रिकी'चे यश

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठअंतर्गत घेतलेल्या ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

आर्किटेक्चरच्या पहिल्या वर्षातील प्रणोती दत्तात्रय पाटील हिने 'मेहंदी स्पर्धे'त, तर आर्किटेक्चरच्या चौथ्या वर्षातील राजकुमार अजयराज याने पाश्चिमात्य 'एकल गायन' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशनच्या द्वितीय वर्षातील जुही अरुण धारवाडे हिने इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. या तिघांचीही शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली. यात प्रणोती पाटीलने मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये मेहंदी स्पर्धेत अव्वल स्थान कायम राखले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृह राज्यमंत्री सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे यांनी अभिनंदन केले. अधिष्ठाता डॉ. अद्वैत राठोड, जिमखाना विभागप्रमुख डॉ. राजेंद्र रायकर व सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. राहुल पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2021
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात डी. वाय. पाटील अभियांत्रिकीचे यश

प्रतिनिधी
कसबा बावडा

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत घेण्यात आलेल्या ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

प्रथम वर्ष आर्किटेक्चरच्या प्रणोती दत्तात्रय पाटील हिने 'मेहंदी स्पर्धे'मध्ये प्रथम क्रमांक तर चतुर्थ वर्ष आर्किटेक्चरच्या राजकुमार अजयराज याने पाश्चिमात्य 'एकल गायन' स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशनच्या जुही अरुण धारवाडे हिने इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. या तिघांचीही शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली. यात प्रणोती पाटील हिने मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये मेहंदी स्पर्धेतही अव्वल स्थान कायम राखले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष गृह राज्यमंत्री सतेज पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ. लितेश मालदे यांनी अभिनंदन केले. डीन, स्टुडंट अफेअर्स डॉ. अद्वैत राठोड, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. राहुल पाटील यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.